# पोलीस पाटील भरती २०१८ जिल्हा जळगांव

## मुलाखती बाबत जाहीर सूचना

पोलीस पाटील भरती प्रक्रीया २०१८ अंतर्गत लेखी परिक्षा दिलेल्या सर्व उमेदवारांना याव्दारे कळविण्यांत येते की, लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरिता अंतरीम स्वरुपात निवड यादी www.jalgaonexam.com या संकेतस्थळावर जाहीर करण्यांत आलेली असुन निवड यादीतील पात्र उमेदवारांची २० गुणांची मुलाखत परिक्षा **दिनांक-३०/१०/२०१८ मंगळवार रोजी सकाळी ९.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय** येथे आयोजीत करण्यांत आली असुन उपविभागीय निवड समिती निहाय खालील ठिकाणी मुलाखती घेण्यांत येतील.लेखी परिक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास मुलाखत परिक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील.मुलाखत परिक्षेस अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतीम निवडीसाठी अपात्र ठरेल.

| अ.क्र. | उपविभागीय निवड समिती | जिल्हाधिकारी कार्यालयात मुलाखत घेण्यांचे ठिकाण |
|---|---|---|
| १) | उपविभागीय निवड समिती जळगांव (जामनेर व जळगांव तालुका) | जिल्हाधिकारी यांचे दालनाजवळील सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव |
| २) | उपविभागीय निवड समिती भुसावळ (भुसावळ,बोदवड व मुक्ताईनगर तालुका) | जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे दालन जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव |
| ३) | उपविभागीय निवड समिती पाचोरा (पाचोरा व भडगांव तालुका) | उपजिल्हाधिकारी रोजगार हमी योजना यांचे दालन जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव |
| ४) | उपविभागीय निवड समिती अमळनेर (अमळनेर व चोपडा तालुका) | उपजिल्हाधिकारी महसूल प्रशासन यांचे दालन जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव |
| ५) | उपविभागीय निवड समिती चाळीसगांव (चाळीसगांव तालुका) | जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे दालन जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव |
| ६) | उपविभागीय निवड समिती एरंडोल (एरंडोल धरणगांव व पारोळा तालुका) | उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालन जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव |
| ७) | उपविभागीय निवड समिती फैजपूर ( यावल व रावेर तालुका) | राज शिष्टाचार अधिकारी यांचे दालन जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव |

प्राप्त केलेल्या गुणांचे आधारे गुणवत्तेनुसार अंतीम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर **संबंधित मूळ प्रमाणपत्रे (दोन झेरॉक्स संचासहीत स्वसाक्षांकित केलेले) तपासणीसाठी उपलब्ध करुन** दयावी लागतील,अन्यथा तोंडी परीक्षा/अंतीम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**अनिवार्य असणारी प्रमाणपत्रे**

१) उमेदवारांनी खाली नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेसबंधी प्रमाणपत्रांपधील त्यांना लागू असलेली प्रमाणपत्रे उपलब्ध करुन दयावीत.

- महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा इयत्ता १० वी (एसएससी उत्तीर्ण प्रमाणपत्र)/ इतर समकक्ष बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला
- मूळ आधारकार्ड

- महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता १२ वी प्रमाणपत्र ( एचएससी उत्तीर्ण प्रमाणपत्र) /इतर समकक्ष बोर्डाचे प्रमाणपत्र /पदविका प्रमाणपत्र
- पदवी प्रमाणपत्र
- पदवोव्युत्तर प्रमाणपत्र

२) उमेदवार शारीरिकदृष्या सक्षम असल्याबाबतचे वैद्यकीय अधिक्षक,ग्रामीण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र

३) स्थानिक/कायम रहीवासी असलेबाबत सबंधित गावाचे ग्रामसेवक/तलाठी यांचा दाखला

४) उमेदवाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे सबंधित पोलीस स्टेशनकडील चारित्र्य प्रमाणपत्र

५) उमेदवार कोणत्याही राजकीय पक्षाशी सबंध ठेवणार नसलेबाबतचे रु.१००/- चे स्टॅप पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्र ( प्रतिज्ञापत्राचा नमुना www.jalgaonexam.com या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेला आहे)

६) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन ) नियम २००५ मधील लहान कुटूंबाचे घोषणापत्र ( प्रमाणपत्राचा नमुना www.jalgaonexam.com या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेला आहे)

७) मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदाकरिता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र

८) मागास प्रवर्गातील उमेदवार (वि.जा.(अ) भज-(ब) भज- (क) भज-(ड) विमाप्र व इमाव यांना २०१८-२०१९ या कालावधीकरिता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर ) प्रमाणपत्र

९) महिला उमेदवारांसाठी २०१८-२०१९ या कालावधीकरिता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमीलेअर ) प्रमाणपत्र

१०) MSCIT /संगणक अर्हता प्रमाणपत्र

११) NSS/NCC/MCC प्रमाणपत्र

१२) खेळातील प्राविण्य प्रमाणपत्रे

- शालेय स्तरावरील खेळाबाबतचे प्राविण्य प्रमाणपत्र
- तालुका स्तरावरील खेळाबाबतचे प्राविण्य प्रमाणपत्र
- जिल्हास्तरावरील खेळाबाबतचे प्राविण्य प्रमाणपत्र
- आंतर विदयापीठ/राज्य/देश स्तरावरील खेळाबाबतचे प्राविण्य प्रमाणपत्र

उमेदवारांना स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे लागेल यासाठी कोणताही भत्ता दिला जाणार नाही